REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य

प्रा. डॉ. दत्तात्रय बारबोले
मराठी विभाग प्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज

## प्रस्तावना :–



प्रगत भारताचे लोकशिक्षक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी परंपरानिष्ठ मूल्यव्यवस्थेविरुध्द नवमूल्यात्मक मांडणीसाठी लोकशिक्षण, लोकलढे, लोक आंदोलने, लोकचळवळी, लोकप्रबोधनासाठी, 'बहिष्कृत भारत' आणि 'मूकनायका' तून आपली जी तत्त्वज्ञानात्मक भुमिका निर्भिडपणे आणि प्रेरणात्मक पध्दतीने मांडल्यामुळेच वाङ्मय निर्मिती होऊ शकली. दलित वाङ्मय हा भारतीय पातळीवर अनेक संदर्भीय इतिहास आहे. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नावाचा धार्मिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, नैतिक, तत्त्वज्ञानात्क, मानसशस्त्रीय, तर्कशास्त्रीय, नितीशास्त्रीय, कायदेशास्त्रीय, संख्याशास्त्रीय, वैद्यकशास्त्रीय, शिक्षणशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय, सांस्कृतिक-मानववंशशास्त्रीय असा सर्वव्यापक सर्व शास्त्रांचा सर्वसमावेशक आणि सर्व संदर्भीय इतिहास असल्यामुळेच १९२० पासून लेखन करणाऱ्या सर्वच लेखकाची प्रेरणा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुढील लढयाच्या प्रेरणेने वाङ्मयनिर्मिती झाली आहे.

१)काळाराम मंदीर प्रवेश लढा
२) महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह
३) मनुस्मृती दहन
४) येवल्याची धर्मांतराची ऐतिहासिक जाहीर घोषणा
५) गोलमेज परिषदेतील सत्यनिष्ठ भूमिका
६) पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना
७) भारतीय संविधान निर्मिती
८) हिंदुकोड बिल मंजुर न झाल्याबद्दल कायदेमंत्रीपदाचा दिलेला राजीनामा
९) पुणे करार
१०) महापरिनिर्वाण

महापुरुषाच्या आयुष्यातील या दहा घटनांमुळे भारतीय समाज संपूर्णपणे ढवळुन निघाला. प्रत्येक प्रसंग, प्रत्येक घटना ऐतिहासिक आणि नवसमाज निर्मितीपुरक असल्यामुळेच भारतीय भाषातील कवी, कथाकार, कांदबरीकार, नाटककार, चरित्रकार, आत्मचरित्रकार, आत्मकथनात्क लेखन करणारे लेखक, वैचारिक लेखन करणारे लेखक, प्रासंगिक लेखन करणारे लेखक, गीतकार, समीक्षक, संपादन आणि प्रकाशकांची उर्जा म्हणजे प्रज्ञासुर्य डॉ. भीमराव रामजी आंबेडकर नावाचे महावादळ होय. भारताच्या इतिहासातील एकमेव नाव असून या नावाने भारताचा इतिहास आणि भूगोल बदलला. या सर्वक्षेत्रीय बदलाचे परिणाम भारतीय समाज व्यवस्थेतील प्रत्येक प्रवर्गावर झाले. अंतर्बाह्यदृष्टया बदलाची गतीस्थिती वाढल्यामुळेच? परंपरावादी मूल्यव्यवस्था परिवर्तनवादी मूल्यव्यवस्था असा अविरत संघर्ष कार्यरत झाला. या आत्मशोधात्मक संघर्षानेच प्रश्न निर्माण केले. आम्ही कोण आहोत? आमचे शोषण कोणी केले? धर्मशास्त्रांना एवढे अधिकार कोणी दिले होते? धर्म, धर्मशास्त्री की अन्वयार्थक मोठे? सर्व समान का नाहीत? समान होणारच नाहीत का? समानतेचे सूत्र हे लोक स्विकारणारच नाहीत का? अशा असंख्य प्रश्नांच्या उत्तराच्या शोधात निघालेले वाङ्मय सेवक हे केवळ शब्दबंबाळाचे धनी नव्हते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक लढयाच्या केंद्रस्थानी अस्पृश्य, दलित 'माणूस' होता. हा उपेक्षित, दुर्लक्षीत, शोषित, गुलाम, अशिक्षित परंतु बंडखोर माणूस हा सर्वांच्या साहित्याचा केंद्रबिंदू होता. हा माणूसच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढ्याचा कणखर साथीदार होता. क्रांतिकारी योध्दा होता. आणि इतिहासाचा नायकही होता. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी निष्ठावान माणसांची एक बलदंड फळी तयार करुन

जुन्या व्यवस्थेला त्र्यंबक सपकाळेंच्या भाषेत 'सुरुंग' लावण्याचे कार्य केले. नामदेव ढसाळांनी परंपरानिष्ठ काव्यलेखन संकेत समूळ नाकरुन मुक्तछंदात कविता लिहिली. मराठीतील अस्सल शिव्यांच्या नोंदीने काव्यशास्त्रालाच घाम फुटला. विद्रोही कवी बाबुराव बागुलांनी पृथ्वीवरील सर्वांपेक्षा आणि सर्वांचा निर्माता माणूसच कसा आहे हे सप्रमाण सिध्द केले. अर्जुन डांगळे यांनी समर्थपणे छावणी हलवली. जेष्ठ कवी ज. वि. पवार, नारायण सुर्वे यांनी तर नव्या माणसांचा आणि व्यवस्थेला जाहीरनामा जाहीर करुन उपेक्षितांच्या दु:खाची सनद मांडली आणि श्रमिकांच्या गाण्यातून त्यांचे विद्यापीठाच उभे केले. दया पवारांनी भारतीय समाजव्यवस्थेचा 'कोंडवाड' हमरस्त्यावर चौकाचौकातून उघडा केला. यशवंत मनोहर, प्रज्ञा लोखंडे, प्रा. दामोदर मोरे असे अगणित कवी, इतिहास, इतिहासातील संदर्भ, न्याय आणि अन्यायात्मक वर्तन विशेषांच्या नोंदी कवितेतून नोंदविल्या आहेत.

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि सहकार्य या पंचसुत्रीच्या मांडणीसाठी परिवर्तननिष्ठ भूमिका घेवून कवी, कथाकार, कांदबरीकार, नाट्यलखक, गीतकार आणि वैचारिक लेखन करणाऱ्या विचारवंतांनी महात्मा गौतम बुध्द, महात्मा बसवेश्वर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, राष्ट्रभूषन डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या कृतीयुक्त लढयांचे वर्णने, तत्त्वज्ञानात्क पेरणी, व्यक्तीमत्वाचे विविध पैलू, बौध्दिक अजोड सामर्थ्य, सर्वच न्यायात्मक चळवळी, प्रसंग, घटना, स्थळ, वर्णने, काळसूचक वर्णने, यशापयशाचे तपशील, क्रांतिकारी निष्ठावंत सहकारी, त्यागी कार्यकर्ते यांचे सूक्ष्म तपशील आपापल्या प्रकृती धर्मानुसार साधार नोंदवून पुढच्या पिढीला ऐतिहासिक दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याचे महत्त्वाचे कार्य दलित साहित्यिकांनी केल्यामुळेच वर्तमान पिढीस भूतकाळातील सर्वच संदर्भ अभ्यासासाठी उपलब्ध झाले आहेत. क्रांतिकारी लेखन अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल, बंधू माधव, ना. रा. शेंडे, शंकरराव खरात, केशव मेश्राम, योगीराज वाघमारे, उत्तम कांबळे, नामदेव व्हटकर, विलास सिंदगीकर, चंद्रकांत वानखेडे, उत्तम बंडू तुपे इत्यादी सर्वच कथालेखकांनी समर्थपणे मांडणी कथालेखनातून केल्यामुळेच मराठी कथेचा परीघ रुंदावला असून आत्मशोध घेत आहे.

कवी, कथालेखकाप्रमाणे कादंबरीकारांनीही चळवळीचा समग्र इतिहास नोंदविण्यासाठी आणि चळवळीतील मूल्यात्मक चढउतार साधार मांडले आहेत. दलित नाटककारांनीही मोठया प्रमाणात उपरोक्त संदर्भीय इतिहासाचे तपशीलात्मक चित्रण केले आहे. स्वतंत्र रंगभूमी, दलित रंगभूमी ते बोधी रंगभूमी असा वैचारिक प्रवास केला असून नवनवे प्रयोग केले जात आहेत. परंतु काव्यलेखन, कथाकथन, आत्मकथनात्मक लेखन आणि वैचारिक लेखनाच्या तुलनेत कांदबरी लेखन आणि नाट्यलेखन गुणात्मकदृट्या चढत्या श्रेणीचे असूनही संख्यात्मकदृष्ट्या कमी आहे. टेक्सास गायकवाड, रामनाथ चव्हाण, प्रकाश त्रिभुवन, दत्ता भगत, लक्ष्मण माने, अमर गायकवाड, प्रभाकर दुपारे, रविचंद्र हडसनकर, प्रकाश मोगले इत्यादी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे तत्वज्ञान केंद्रस्थानी ठेवून विचारवंतांनी सप्रमाण मांडणी केली आहे. डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. गंगाधर पानातावणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. कृष्णा किरवले, उत्तम कांबळे, भालचंद्र मुणगीकर, डॉ. आनंद तेलतंबडे, प्रकाश खरात, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, रामनाथ चव्हाण, यशवंत मनोहर, डॉ. बालाजी वाघमारे, डॉ. गणपत मोरे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. ऋषीकेश कांबळे, डॉ. सुरेश चौथाईवाले या जुन्या आणि नव्या पिढीतील विचारवंतांनी शोषणमुक्त समाजरचनेसाठी भारताची धर्मशास्त्रीय चिकित्सा, समाजशास्त्रीय चिकित्सा, नितीशास्त्रीय चिकित्सा, वर्णव्यवस्था, वर्गव्यवस्था, शिक्षण चिकित्सा ते वर्तमानकालीन राजकीय वास्तव चिकित्सा साधार केल्यामुळेच माणूसकेंद्री प्रक्रिया गतीमान झाली आहे. परंपरानिष्ठ मूल्यव्यवस्था विरुध्द समतावादी मूल्यव्यवस्था अशी महापुरुषीय ऐतिहासिक मांडणी केंद्रस्थानी ठेवून, सैध्दांतिक सप्रमाणता प्रेरक समजून समतोल वैचारिक मांडणी केल्यामुळेच वर्तमान पिढी संभ्रमातून बाहेर पडली आहे, पडत आहे. बोजड वाटणारी परंतु पुढील समाजपुरक मांडणी केल्यामुळेच परंपरेची शास्त्रीय शस्त्रक्रियात्मक चिकित्सा विचावंतांच्या पिढीने केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृतीयुक्त लढ्याचे परिणाम भारतीय समाजव्यवस्थेवर झाल्यामुळेच मानवी मूल्यांचा आग्रह धरुन अविरतपणे समतेसाठी संघर्ष करणारे लोक तयार झाले आहेत. तत्त्वज्ञान, चळवळ, सक्रीयता, मार्गदर्शन आणि प्रत्यक्षकृती असे विचारसूत्र अनुभवास येत आहे. प्रत्येक कालखंडाचे, चळवळीचे, महापुरुषांचे, तत्त्वज्ञानाचे, अनुयायांचे कालखंडात्मक यशापयश तपासण्यासाची पध्दत रुढ झाली आहे. या काळाने झपाटलेपण प्राप्त करुन देवून स्वाभिमान, आत्माभिमान, अस्मिता, अस्तित्व आणि मूल्यात्मक संस्कार प्रेरणा देणारा काळ आहे. महापुरुष आणि तत्त्वज्ञानात्मक चळवळीनेच समाज आणि कार्यकर्ते घडविले. लेखकांना घडविणारी प्रयोगशील प्रयोगशाळा म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. या प्रयोगशाळेमुळेच सामाजिक बांधिलकीतून प्रज्ञावंत लेखक व कलावंतांची पिढी घडली आहे.

## निष्कर्ष :

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे शतकांनाही ओलांडून प्रभावित करणारे होते.
२) मांडलेले तत्त्वज्ञान परंपरेविरुध्द आणि समाजहितार्थ असल्यामुळेच चर्चा आणि चिंतन चालु आहे.
३) व्यक्तिमहत्त्व आणि तत्त्वज्ञानाच्या प्रेरणेतून वाङ्मय निर्मात्यांनी स्वतंत्र भूमिकानिष्ठ निर्मिती केली.
४) सर्वच वाङ्मयप्रकारातून चळवळ, इतिहास, तत्त्वज्ञान आणि समाज चित्रित झाला आहे.
५) मराठी वाङ्मयविश्व समृध्द करण्यासाठी व नोंदीसाठी निर्मिती केली.
६) सर्वच शास्त्रांना नवदृष्टीकोणात्मक कक्षा विस्ताराने बळ मिळाले.

७) भाषिकदुष्ट्या स्वतंत्र अभ्यास करण्यास प्रेरक कार्य ठरले.
८) नवपिढीस प्रेरक, स्वतंत्र निर्मितीपुरक कार्य केले. (दि. १९ डिसेंबर २०१६, कोल्हापूर)